


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

।। आजचा सुविचार ।।
सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

वर्ष : ०६ | अंक : ५९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१२ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# आदित्य, अमित, तेजस यांचा ठिय्या ; ठाकरेंची तरुण पिढी मैदानात!

## शिवाजी पार्क पोलीस ठाण्याबाहेर हजारो कार्यकर्त्यांची गर्दी!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** दादरचे शिवाजी पार्क मैदान परिसर आणि शिवसेना भवन परिसरात वातावरण तापलं आहे. ठाकरेंची तरुण पिढी रस्त्यावर उतरली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे, त्यांचे बंधू तेजस ठाकरे यांनी शिवसेना भवन परिसरात ठिय्या मांडला. तर मनसे नेते अमित ठाकरे यांनी शिवाजी पार्क पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या मांडला आहे. सीजेपीकडून आज शिवाजी पार्कात आंदोलनाची हाक देण्यात आली होती. पण पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी दिलेली नव्हती. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून शिवाजी पार्क परिसरात प्रचंड मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला. त्यावर मनसे नेते अमित ठाकरे यांनी आक्षेप घेतला. अमित ठाकरे यांनी शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गेले. तिथे त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या मांडला आहे.




दुसरीकडे सीजेपीचे कार्यकर्ते शिवाजी पार्क परिसरात आले. यामध्ये तरुण मुलांसह मुलींचादेखील मोठ्या प्रमाणात समावेश होता. आंदोलकांनी शिवाजी पार्कात जाऊ देत नाहीत म्हणून थेट रस्त्यावर ठिय्या मांडला. यावेळी महिला पोलिसांनी तरुणींना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पण आंदोलक तरुणींना जोरदार प्रतिकार केला. त्यामुळे महिला पोलिसांनी एकेक तरुणीला पोलीस व्हॅनमध्ये टाकत ताब्यात घेतलं. तसेच आंदोलक तरुणांचीदेखील धरपकड केली.

एकीकडे या सगळ्या घडामोडी सुरु असतानाच शिवसेना भवन परिसरात शिवसैनिक आणि पोलीस समोरासमोर आले. तिथे ठाकरे गटाचे आमदार महेश सावंत उपस्थित होते. यावेळी पोलीस आणि शिवसैनिक समोरासमोर आले. त्यामुळे वातावरण प्रचंड तापले. या सगळ्या गदारोळात आदित्य ठाकरे, अमित ठाकरे शिवसेना भवन परिसरात दाखल झाले. त्यांनी पोलिसांसमोर तिथेच ठिय्या मांडला. यावेळी शिवसैनिकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी शिवसेना भवन परिसरात प्रवेश करत कार्यकर्त्यांची धरपकड करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप आदित्य ठाकरे यांचा आहे.

**आदित्य ठाकरे काय म्हणाले?**

तुम्ही लोकं पाहताय जे सीमेवर व्हायला पाहिजे, ते इथे होताना दिसत आहे. इथे रोज आंदोलन होणार आणि संपूर्ण महाराष्ट्रात होणार. आम्हाला शिवाजी पार्कात जावू दिलं नाही, आंदोलन करु दिलं नाही तर आम्ही इथेच बसू. रात्र झाली, उद्याचा दिवस उजाडला तरी आम्ही इथेच बसू. यूएन ह्युमन राइट्स काउन्सिलने काल ट्विट केलं आहे की, आपल्या देशात मानवी अधिकारांची कशी पायमल्ली होते. केंद्र सरकारला लाज वाटली पाहिजे. उद्या अजून आंदोलन चिघळेल, असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला. ही सर्व देशप्रेमी मंडळी आहे. त्यांच्या डोक्यावर बसनू मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेऊ. अनेक आंदोलकांना ताब्यात घेतलं आहे. त्या सर्वांना सोडेपर्यंत आम्ही इथेच रस्त्यावर बसणार आहोत. आम्ही असंच रस्त्यावर प्रत्येक दिवशी आंदोलन करणार, असा निर्धार आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला

भाजप घाबरले आहे. आमच्यातून जे भाजपमध्ये पळून गेले आहेत, ते सर्व गद्दार आहेत. एकनाथ शिंदे कुठे आहेत? त्यांच्यासोबत असणारे खासदार कुठे आहेत? अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली. सरकारच्या मनात एवढी भीती निर्माण झाली आहे की, विद्यार्थ्यांना रस्त्यावर येऊ देत नाहीत. हा भयानक प्रकार आहे. अजूनही आंदोलन शांत आहे. जर आंदोलनाला हात लागला तर हे आंदोलन चिघळेल, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

**आदित्य ठाकरे शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात पोहचले**

जवळपास तासभर शिवसेना भवन परिसरात आंदोलन केल्यानंतर आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे शिवाजी पार्क पोलीस ठाणे परिसरात दाखल झाले. तिथे अमित ठाकरे आधीच ठिय्या मांडून बसले आहेत. सर्व आंदोलकांना तातडीने सोडा, अशी मागणी ठाकरे बंधूंची आहे.

---

# एमपीएससी आंदोलनानंतर सरकारचा मोठा निर्णय

## एमपीएससी विद्यार्थ्यांची मोठी मागणी

## राज्य सरकारकडून मान्य




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारात सुधारणा करण्यासह विविध मागण्यांसाठी पुण्यात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारच्या वतीने मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री सकारात्मक असून एमपीएससीमधील सुधारणांसाठी दोन महिन्यांच्या कालावधीची पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सरकारने मान्य केलेल्या मागण्यांचा मसुदाही विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाला सुपूर्द करण्यात आला आहे.

एमपीएससीमधील सुधारणांसाठी स्थापन होणाऱ्या चौकशी आयोगाच्या अध्यक्षपदी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश न्या. दिलीप भोसले यांची नियुक्ती प्रस्तावित आहे. माजी न्यायाधीश न्या. पी. डी. नाईक, प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे, सेवानिवृत्त सचिव गणेश पाटील आणि पोलीस महानिरीक्षक लखमी गौतम यांचा या समितीत समावेश असेल. तुकाराम मुंढे हे समितीचे सचिव म्हणून काम पाहणार आहेत. एमपीएससीच्या कामकाजातील त्रुटी आणि आवश्यक सुधारणांचा अभ्यास करून समिती दोन महिन्यांत आपला अहवाल सादर करणार आहे.

विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सरकारने मान्य केलेल्या मसुद्यात काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे. पेपरफुटी झालेल्या सर्व परीक्षांची चौकशी करण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकार आणि त्यासंबंधीच्या तक्रारींची तपासणी होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय सत्याग्रह आंदोलनादरम्यान आंदोलक विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याबाबतही निर्णय घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

२०२७ मध्ये होणाऱ्या गट क परीक्षेतील पदांची संख्या दुप्पट करण्याचा मुद्दाही सरकारने मान्य केलेल्या मागण्यांच्या मसुद्यात नमूद आहे. यामुळे आगामी भरती प्रक्रियेत अधिक संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली जात आहे. सर्व परीक्षा ऑफलाईन घेण्यात येणार आहेत. राज्य सरकारने ती मान्य केली आहे. वन कार्ड योजना सरकारने मान्य केली आहे.चालू घडामोडी प्रश्नांची काल मर्यादा ठरवण्यात येणार आहे. याबाबत समिती निर्णय घेणार आहे.

मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक पावले उचलली जात असल्याचे सांगितले. सरकारकडून मान्य करण्यात आलेल्या मागण्यांचा मसुदा रोहित पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. आता या घोषणांची अंमलबजावणी, चौकशी आयोगाचे प्रत्यक्ष कामकाज आणि भरतीसंदर्भातील निर्णय याकडे एमपीएससी विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

---

# राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांची वर्षावर बैठक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पुढील सहा ते आठ महिने अधिक आधार देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबतच्या बैठकीत दिली. केंद्रीय पथकाकडून दुष्काळी भागातील परिस्थितीबाबतचा अहवाल केंद्र शासनाला सादर होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्रीय पथकाने अत्यंत विस्तृत दौरा करून तळागाळापर्यंत प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. त्यामुळे नागरिकांमध्ये आपल्या अडचणी समजून घेतल्याचे समाधान निर्माण झाले असल्याचे या वेळी केंद्रीय पथकाला सांगितले. केंद्रीय पथकाच्या संवेदनशील पाहणीमुळे दुष्काळाची तीव्रता केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत चांगला पाऊस झाल्याने विक्रमी उत्पादनाची अपेक्षा होती. पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच त्यानंतर पावसात सुमारे दोन महिने खंड पडला. त्यामुळे सोयाबीन पिकाला अनेक ठिकाणी सर्वाधिक झळ बसली. तर कापूस, तूर आणि ऊस ही पिकेही बाधित झाली आहेत. पाण्याअभावी रब्बीची पेरणी होण्याची शक्यता कमी असून उन्हाळी पिकांनाही वाव राहिलेला नाही. खरीप हंगामातील नुकसान रब्बी किंवा उन्हाळी पिकातून भरून काढण्याची संधीही यंदा शेतकऱ्यांना मिळणार नाही. शेतीबरोबरच शेतमजुरी करणाऱ्या लहान शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट



निर्माण झाले आहे. त्यामुळे रोजगार आणि अन्नसुरक्षेच्या योजनांच्या माध्यमातून नियोजन करुन मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील लहान गावांमध्ये पाण्याचे स्रोत आटले आहेत. या भागांत मोठ्या प्रमाणावर टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठ्यात तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक गावापर्यंत पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाणी पोहोचविण्याचा आराखडा राज्य शासन तयार करीत आहे. ऑगस्ट २०२७ पर्यंत उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण पिण्यासाठी करण्यात आले आहे. त्यात नागरिक आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याची स्वतंत्र तरतूद केली असून त्यानंतरच अन्य वापरासाठी पाणी उपलब्ध केले जाईल. या आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जलसाठ्यांतील गाळ काढणे, दुरुस्ती आणि पुनरुज्जीवनाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. यापूर्वी २५ हजार गावांमध्ये राबविलेल्या कामांमुळे १५ ते १७ टक्के पाणी तूट असतानाही त्या भागांना दिलासा मिळाला. सॉफ्टवेअर आणि ॲपच्या माध्यमातून अशा कामांची पारदर्शक अंमलबजावणी करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विविध जिल्ह्यांत उपलब्ध चाऱ्याचा साठा ९० ते १२० दिवसांपर्यंतचा आहे. मातीमध्ये ओलावा असलेल्या पाणलोट क्षेत्रांत चारा उत्पादन वाढविण्यात येईल. उपलब्ध चारा शासनाने घोषित केलेल्या दराने खरेदी करून त्याच्या साठवणुकीची व्यवस्था केली जाईल. आवश्यकता भासल्यास चांगला पाऊस झालेल्या अन्य राज्यांतूनही चारा उपलब्ध करण्याचा विचार केला जाईल. पशुधन वाचविण्यासाठी गरजेनुसार चारा छावण्या आणि पशू छावण्यांचा पर्याय स्वीकारण्यात येईल. ग्रामीण भागातील नागरिकांना जलसंधारणाच्या कामांमध्ये सहभागी करून घेण्यात येईल. माथा ते पायथा या संकल्पनेनुसार विद्यमान जलसंधारण संरचनांची दुरुस्ती तसेच नवीन संरचनांची निर्मिती लोकसहभागातून केली जाईल. त्यामुळे गावांमध्ये रोजगार निर्माण होण्याबरोबरच नागरिकांना मदत व दिलासा मिळेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्य शासन केंद्र सरकारच्या निकषांनुसार आकडेवारीवर आधारित सविस्तर आणि नेमके निवेदन सादर करणार आहे. केंद्रीय कृषीमंत्र्यांनी आगाऊ निवेदन सादर करण्याबाबत संपर्क केला आणि ते आम्ही सादर केले. केंद्रीय गृहमंत्र्यांनी आंतरमंत्रालयीन गटाची बैठक लवकर घेऊन मदत देण्याची प्रक्रिया गतिमान करण्याचे आश्वासन दिल्याचेही त्यांनी सांगितले. पीक विम्याचे संरक्षण तुलनेने कमी असले तरी विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ लवकर मिळवून देण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या सहकार्याने प्रयत्न करेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीस आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य उपस्थित होते.

---

# खाकीतला 'शेठ' की वसुलीचा 'डॉन'? लक्ष्मीनगरच्या डी.बी.कर्मचाऱ्याच्या मुळशी पॅटर्नस्टाईल खेळाचा पर्दाफाश



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.११, येरवडा (पुणे) :** येरवडा परिसरातील लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकातील एक कर्मचारी सध्या संपूर्ण परिसरात 'वसुली बहाद्दूर' आणि 'शेट' म्हणून चांगलाच चर्चेत आला आहे. 'मला पैशांची गरज आहे, मदत करा' असे सांगून सामान्यांचे खिसे कापणाऱ्या या कर्मचाऱ्याचा खरा चेहरा आता समोर येत असून, खाकी वर्दीला काळीमा फासणारा अत्यंत विकृत खेळ त्याने सुरू केला आहे.

यापूर्वी गुन्हेगारी जगतात स्वतःचा वचक निर्माण करण्यासाठी आणि वरिष्ठांसमोर स्वतःची शेखी मिरवण्यासाठी याच कर्मचाऱ्याने गुन्हेगारांमध्ये आपापसांत भांडणे लावून दिली होती. तो तुझ्याबद्दल असा बोलला, तू त्याला मारून माझ्याकडे हाजीर हो! अशा शब्दांत चिथावणी देऊन गुन्हेगारांना आपापसांत भिडवणारा आणि स्वतः खबरी बनून गुन्हेगारीचा सूत्रधार होणारा हाच तो 'शेट' कर्मचारी आहे!

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळ फेकत 'मीच किती काम करतो आणि बाकीचे कसे काम करत नाहीत,' असा दिखावा करत स्वतःला खूप चांगले सिद्ध करण्याचा हा केविलवाणा आणि धोकादायक प्रयत्न सातत्याने सुरू आहे. वरिष्ठांच्या नजरेत स्वतःचा टीआरपी वाढवण्यासाठी गुन्हेगारीला खतपाणी घालणारा आणि दुसरीकडे 'मुळशी पॅटर्न'ची आठवण करून देत लोकांकडून पैसे उकळणारा हा कर्मचारी नेमका कोणाच्या छत्रछायेखाली फुगला आहे? स्वतःच्या फायद्यासाठी शहरात कायदा-सुव्यवस्थेची वाट लावणारा हा 'वसुली बहाद्दूर' पोलीस दलात राहण्यास खरोखरच योग्य आहे का? अशा विकृत कारवायांची वरिष्ठ अधिकारी दखल घेणार की या 'शेट'च्या नाट्याकडे कानाडोळा करणार, हा मोठा प्रश्न आहे. पुणे पोलीस आयुक्तांनी या भामट्या कर्मचाऱ्याच्या संपूर्ण कारभाराची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून त्याला तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी होत आहे.

अक्षराज






## पश्चिम घाटाचे मोल

पश्चिम घाट पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने पश्चिम घाटातील सहा राज्यांमध्ये पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणजेच ईएसए निश्चित करण्यासाठी नव्या मसुदा अधिसूचनेचा प्रस्ताव मांडला आहे. गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तमिळनाडू या राज्यांमधील मोठा भूप्रदेश या प्रस्तावात समाविष्ट आहे. खाणकाम, दगडखाणी, वाळू उत्खनन, काही प्रकारचे उद्योग आणि मोठ्या बांधकामांवर निर्बंध आणण्याची तरतूद यात आहे. पश्चिम घाटाची पर्यावरणीय संवेदनशीलता आणि वाढता मानवी दबाव लक्षात घेता, या तरतुदी महत्त्वाच्या आहेत. भारताच्या मान्सून व्यवस्थेत पश्चिम घाटाची महत्त्वाची भूमिका आहे. अरबी समुद्रातून येणाऱ्या आर्द्र वाऱ्यांना या पर्वतरांगांमुळे उंची मिळते आणि मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. अनेक नद्या याच भागातून उगम पावतात. शेती, पिण्याचे पाणी, जलविद्युत, जैवविविधता आणि लाखो लोकांचे जीवन या सगळ्याशी पश्चिम घाट जोडलेला आहे. त्यामुळे विकासाच्या नावाखाली या प्रदेशातील निसर्ग कमकुवत करणे कोणाच्याही हिताचे नाही.

पश्चिम घाटात काय बंद करायचे, हा मुद्दा केवळ महत्त्वाचा नाही, त्याहून महत्त्वाचा प्रश्न आहे की संरक्षण नेमके कसे करायचे? नव्या ईएसए मसुद्याची एक जमेची बाजू म्हणजे खाणकाम आणि दगडखाणींसारख्या पर्यावरणावर मोठा परिणाम करणाऱ्या उपक्रमांवर स्पष्ट निर्बंध आणण्याचा प्रयत्न. मोठ्या बांधकाम प्रकल्पांवर आणि काही प्रदूषणकारी उद्योगांवरही मर्यादा प्रस्तावित आहेत. जलविद्युत प्रकल्पांसाठीही काही तरतुदी आहेत. अनियंत्रित विकासावर त्या काही प्रमाणात नियंत्रण ठेवू शकतात. पण या मसुद्याकडे केवळ 'काय बंद होणार' या दृष्टीने पाहणे योग्य नाही. स्थानिक लोकांच्या मनातील भीतीही समजून घ्यावी लागेल. अनेक गावांमध्ये आधीपासून घरे, शेती, लहान व्यवसाय आणि स्थानिक पायाभूत सुविधा आहेत. ईएसएमध्ये एखादा प्रदेश समाविष्ट झाल्यानंतर सामान्य नागरिकाच्या दैनंदिन जीवनावर नेमका काय परिणाम होईल, याबाबत स्पष्टता नसेल, तर पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक विकास यांच्यात संघर्ष निर्माण होऊ शकतो. पश्चिम घाटात पाऊस सर्वत्र सारखा पडत नाही. काही किलोमीटरच्या अंतरातच पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात बदलू शकते. उंची, उताराची दिशा, पर्वतरांगांची रचना आणि स्थानिक वातावरणीय प्रक्रिया यामागे कारणीभूत असतात. त्यामुळे एखाद्या भागाचा फक्त वार्षिक पाऊस पाहून त्याची पर्यावरणीय किंवा आपत्तीची जोखीम ठरवणे पुरेसे नाही. आज खरी चिंता अतिवृष्टीची आहे. काही तासांत किंवा एक-दोन दिवसांत होणारा प्रचंड पाऊस डोंगरउतारांमध्ये पाणी मुरवतो, माती संतृप्त करतो आणि अनेकदा भूस्खलनाला कारणीभूत ठरतो. मोठ्या प्रमाणात पाणी खालील भागात पोहोचल्याने अचानक पूर येऊ शकतो. त्यामुळे पश्चिम घाटात पाऊस, भूस्खलन आणि पूर हे तीन वेगळे विषय नसून एका परस्पर जोडलेल्या प्रक्रियेचे भाग आहेत. भविष्यात अतिवृष्टीच्या घटनांची तीव्रता वाढली आणि पायाभूत सुविधा आजच्या हवामान आकडेवारीवरच उभ्या राहिल्या, तर जोखीम वाढेल. एखादा रस्ता, पूल, धरण किंवा पर्यटन प्रकल्प पुढील ३०-५० वर्षे वापरला जाणार असेल, तर त्याच्या नियोजनात त्या काळातील संभाव्य हवामानाचाही विचार व्हावा. यासाठी ईएसएची सीमा आखताना केवळ वनक्षेत्र किंवा जैवविविधतेचा विचार पुरेसा नाही. पावसाची तीव्रता, भूस्खलनाचा धोका, उतार, भूगर्भरचना, जलवाहिन्या, माती, भूजल पुनर्भरण आणि जमिनीच्या वापरातील बदल यांचाही विचार करावा लागेल. काही ठिकाणी जैवविविधतेची संवेदनशीलता आणि हवामान-संबंधित आपत्तीची जोखीम एकाच ठिकाणी केंद्रित असू शकते. अशा भागांसाठी अधिक काळजीपूर्वक नियोजन आवश्यक आहे. पश्चिम घाटाबाबतीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रकल्प स्वतंत्रपणे पाहण्याची पद्धत. एक रस्ता, एक रिसॉर्ट किंवा एक जलविद्युत प्रकल्प पाहिला, तर त्याचा परिणाम मर्यादित वाटू शकतो. पण त्याच खोऱ्यात अशा अनेक प्रकल्पांची संख्या वाढली, जंगलतोड झाली, उतार बदलले आणि नैसर्गिक नाले अडवले गेले, तर एकत्रित परिणाम गंभीर असतो. म्हणूनच पर्यावरणीय मूल्यांकन केवळ प्रकल्पापुरते न राहता संपूर्ण नदीखोऱ्याच्या किंवा उपखोऱ्याच्या पातळीवर व्हायला हवे. माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील थर्शीशऑप ऋहरीं एलेश्रेसू एशिऑं झरपशश्र च्या अहवालाकडेही या संदर्भात पुन्हा पाहण्याची गरज आहे. त्या अहवालातील प्रत्येक शिफारस आज तशीच लागू करावी, असे नाही. गेल्या दशकात हवामान विज्ञान, उपग्रह निरीक्षण, भू-स्थानिक तंत्रज्ञान आणि आपत्तीविषयक माहितीमध्ये मोठी प्रगती झाली आहे. मात्र स्थानिक पातळीवर पर्यावरणीय संवेदनशीलता ओळखणे, नदीखोऱ्याच्या पातळीवर नियोजन करणे आणि ग्रामसभांना निर्णयप्रक्रियेत स्थान देणे या मूलभूत कल्पना आजही महत्त्वाच्या आहेत.

**– डॉ. प्रतीक कड**

# देवीचे माहात्म्य !



देवीच्या उपासनेची परंपरा पुष्कळ पूर्वीपासून भारतात चालत आलेली आहे. देवीचे मूळ रूप निर्गुण असले, तरी तिच्या सगुण रूपाची उपासना करण्याची परंपरा भारतात प्रचलित आहे. कुलदेवी, ग्रामदेवी, शक्तीपीठ आदी रूपांमध्ये देवीच्या विविध सगुण रूपांची उपासना केली जाते. हिंदु संस्कृतीमध्ये जितके महत्त्व देवाला आहे, तितकेच देवीलाही आहे, हे विशेषत्वाने सांगावेसे वाटते. भारतात अन्य संप्रदायांप्रमाणेच शाक्त संप्रदायही कार्यरत आहे. पंचायतन पूजेमध्ये शिव, विष्णु, गणपति आणि सूर्य यांसमवेत देवीच्या पूजनाचेही विशेष महत्त्व आहे. उपासकांच्या हृदयात देवीला विशेष स्थान असल्यामुळेच प्रतीवर्षी नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहाने भारतभर साजरा केला जातो.

भारतामध्ये विविध संप्रदाय कार्यरत आहेत. या संप्रदायांनुसार संबंधित देवतेची उपासना प्रचलित आहे. गाणपत्य, शैव, वैष्णव, सौर्य, दत्त आदी संप्रदायांप्रमाणे शाक्त संप्रदायाचे अस्तित्वही पुष्कळ प्राचीन काळापासून भारतामध्ये आहे. शाक्त संप्रदायाने सांगितल्याप्रमाणे शक्ती उपासना करणारे अनेक शाक्त भारतात सर्वत्र आढळतात. आद्य शंकराचार्य यांनी पंचायतन पूजेची प्रथा भारतात चालू केली. त्यामध्ये देवीचे स्थान महत्त्वाचे आहे. भारतात ज्या उपास्यदेवतांची उपासना केली जाते, त्या प्रमुख पाच देवतांपैकी एक शक्ती, म्हणजे देवी आहे. तंत्रशास्त्राचे पालन करणारे तांत्रिक तंत्रशास्त्राचे जनक सदाशिवाची उपासना करतात, त्याप्रमाणे त्रिपुरसुंदरी, मातंगी, उग्रतारा आदी तांत्रिक शक्तींचीही उपासना करतात. शिवाप्रमाणेच शक्तीही तंत्रशास्त्राची आराध्य देवता असल्याचे सुस्पष्ट होते.

पार्वतीमाता ही शिवाची अर्धांगिनी असली, तरीही शिवाकडून गूढ ज्ञान प्राप्त करतांना पार्वतीची भूमिका एखाद्या जिज्ञासूची असल्याचे जाणवते. तीव्र जिज्ञासेपोटी तिला तहान-भूक आणि झोप यांचेही भान रहात नाही. ज्ञानप्राप्तीच्या लालसेने ती शिवाला अनेक प्रश्न विचारते. यांतूनच प्रसिद्ध शिव-पार्वती यांचा वार्तालाप किंवा त्यांचे संभाषण यांचा उल्लेख पुराणांमध्ये झालेला आढळतो. पार्वती स्वतः आदिशक्ती असली, तरी गुरुसमान असणार्या शिवाकडून ज्ञानार्जन करण्यासाठी ती जिज्ञासू आणि मुमुक्षु यांचे मूर्तीमंत स्वरूप बनते. त्यामुळेच शिवाने पार्वतीला तंत्रशास्त्राचे गूढ ज्ञान दिले. ऋषिमुनी ज्याप्रमाणे कठोर तप करून भगवंताला प्रसन्न करून घेतात, तसेच कठोर तप पार्वतीने शिवशंकराला प्रसन्न करण्यासाठी केले होते. केवळ झाडाची पाने खाऊन राहिल्यामुळे पार्वतीला अपर्णा हे नाव प्राप्त झाले. पार्वती हिमालयराजाची कन्या आणि राजकुमारी होती. ती सुंदर आणि सुकोमल होती, तरीही शिवाला प्रसन्न करण्याचा तिचा दृढ निश्चय असल्यामुळे तिने देहाची तमा न बाळगता बर्फाने आच्छादलेल्या प्रांतात विशिष्ट मुद्रा धारण करून प्रदीर्घकाळ तप केले. तिच्या तपाची उग्रता इतकी होती की, त्यातून निर्माण झालेल्या ज्वाळा संपूर्ण ब्रह्मांडात पसरत होत्या आणि स्वर्गावर अधिपत्य मिळवलेल्या तारकासुरालाही भयभीत करून टाकणार्या होत्या. पार्वतीच्या वधासाठी जवळ आलेल्या तारकासुराच्या सैनिकांना तिची शक्ती सहन न झाल्यामुळे ते भस्मसात झाले. नवदुर्गांपैकी ब्रह्मचारिणी हे रूप हातात जपमाळ घेऊन तापसी वेश धारण केलेल्या तपस्यारत पार्वतीचेच प्रतीक आहे. पार्वतीला अपर्णा आणि ब्रह्मचारिणी या नावांनीही संबोधले जाते. कैलासावर निवास करत असतांना स्नानाच्या वेळी कक्षाच्या पहार्याची सेवा करण्यासाठी पार्वतीने अंतःप्रेरणेने स्वतःच्या मळापासून गणपतीची निर्मिती केली. सुरक्षेच्या वैयक्तिक कारणास्तव जरी गणपतीची निर्मिती केलेली असली, तरी पार्वतीमुळे जगताला आराध्य दैवत श्री गणेश लाभले आहेत, हे त्रिवार सत्य आहे. देवी कौशिकीची निर्मितीही अशाच भावातून झालेली आहे. समुद्रमंथनाच्या वेळी मंदराचल पर्वताने स्वतःमध्ये शोषून घेतलेल्या विषाच्या प्रभावापासून त्याची मुक्तता करण्यासाठी शिवासमवेत गेलेल्या पार्वतीने त्याच्यावर करुणामय दृष्टीने कृपा केली. तेव्हा मंदराचलातून बाहेर पडणारा विषारी वायू शिवशंकर स्वतः शोषून घेत असतांना काही अंशाचा परिणाम पार्वतीवर होऊन ती काळी झाली. उमेला तिचा गौरवर्ण अतिशय प्रिय असल्याने पुन्हा गौर वर्ण प्राप्त करण्यासाठी तिने ब्रह्मदेवाला प्रसन्न करण्यासाठी कठोर तपाला आरंभ केला. तिच्या तपश्चर्येने प्रसन्न झालेल्या ब्रह्मदेवांनी तिला गौर वर्ण पुन्हा प्रदान केला आणि त्याच वेळी तिच्या श्यामवर्णातून कौशिकी नावाच्या एका देवीची निर्मिती केली. या देवीने पुढे शुंभ-निशुंभ या दैत्यांचा वध केला. यावरून स्वतःच्या श्यामवर्णाचे निमित्त साधून पार्वतीने संपूर्ण जगाला त्रस्त करणार्या शुंभ-निशुंभ या दैत्यांचा संहार करणार्या देवीची निर्मिती केली. श्री गणेशाचा शिरच्छेद केल्याचे समजल्यावर पार्वती विव्हल होऊन रुदन करू लागते आणि पुढच्याच क्षणी नवदुर्गेचे उग्र रूप धारण करून देवतांना कठोर वचन सुनावते. गणपतीला हत्तीचे मस्तक लावल्यानंतर पार्वतीचे उग्र रूप शांत होऊन ती उमेचे रूप धारण करते. देवी कौशिकीवर प्रहार करण्यासाठी आलेल्या असुरांना दंड देण्यासाठी पार्वती चंडी, चामुंडा, असे उग्र रूप धारण करून असुरांचा संहार करते आणि दुसर्याच क्षणी पुत्रीसमान असणार्या कौशिकीच्या प्रेमापोटी काळजीने व्याकुळ होते. पार्वतीमध्ये अतीसंवेदनशील आणि अतीकठोर हे विरुद्ध गुण एकाच वेळी प्रबळ असल्याचे जाणवते.

नेहमी तपस्वी जीवन व्यतीत करणारे सौम्य रूप धारण करणार्या पार्वतीदेवीने प्रसंगी देवता आणि ब्रह्मांड यांचे आसुरी शक्तींच्या त्रासापासून संरक्षण व्हावे, यासाठी उग्र रूप धारण केल्याची अनेक उदाहरणे पुराणांत मिळतात. ब्रह्मदेवाकडून अजेय होण्यासमवेत चारही वेद प्राप्त करणार्या दुर्गमासुरामुळे धर्माला अवकळा प्राप्त झाली होती आणि सर्वत्र अधर्म बळावला होता. अशा परिस्थितीत देवतांचे बळ क्षीण झाले होते. तेव्हा दुर्गमासुराला केवळ स्त्री शक्तीच नष्ट करू शकत होती; कारण अन्य देवतांकडून अवध्य असण्याचे वरदान दुर्गमासुराला प्राप्त झालेले होते. तेव्हा पार्वतीने आदिशक्तीचे स्वरूप प्रगट करत श्री दुर्गादेवीचे रूप धारण केले आणि दुर्गमासुराशी घनघोर युद्ध करून त्याचा वध केला. अशाच प्रकारे अपराजित योद्धा आणि बलाढ्य आसुरी शक्ती यांनी युक्त असणार्या महिषासुराचा वध करण्यासाठी पार्वती, लक्ष्मी अन् सरस्वती या तिन्ही देवींची शक्ती एकत्रित होऊन त्यातून महिषासुरमर्दिनी देवीची निर्मिती झाली. मायावी शक्तीच्या साहाय्याने युद्ध करणार्या महिषासुराला पराभूत करून देवीने त्याचा शिरच्छेद केला. तशाच प्रकारे पार्वतीने चामुंडा रूप धारण करून चंड-मुंड या दैत्यांचा संहार केला आणि कालीचे रूप धारण करून असंख्य असुरांचा वध करून देवतांना अभयदान दिले. दुर्गमासुराने वेदांना पाताळात नेऊन बंदीवान केल्यामुळे धर्माचा लोप झाला.

यज्ञयाग आणि उपासना यांत खंड पडल्यामुळे देवतांना त्यांचा हविर्भाग मिळेनासा झाला. त्यामुळे देवतांचीही शक्ती क्षीण झाली. देवतांचा पृथ्वीवरील कृपावर्षाव थांबल्यामुळे पृथ्वीवर भीषण दुष्काळ पडला. नदी, झरे, पाणवठे आटून गेले. तेव्हा पृथ्वीवरील मरणोन्मुख स्थितीला सामोरे जाणार्या जिवांची दुर्दशा पाहून महिषासुरमर्दिनी मातेच्या डोळ्यांत पाणी तरळले आणि तिच्यातून शताक्षीदेवीची निर्मिती झाली. शंभर लोचन असणार्या या देवीच्या डोळ्यांतून वाहणार्या अश्रूधारा पृथ्वीवर आल्या आणि त्यांनी नद्यांचे रूप धारण केले. अशा प्रकारे सर्वत्र पाणी उपलब्ध झाले. नंतर देवीच्या अंशातून शाकंभरीदेवीची निर्मिती झाली, जिने तिच्या कृपेने पृथ्वीवर सर्वत्र शाक, म्हणजे पालेभाज्या आणि फळभाज्या निर्माण केल्या. अशा प्रकारे पृथ्वीवरील जिवांसाठी पाणी आणि शाक उपलब्ध होऊन पृथ्वीवरील दुष्काळाच्या संकटाचे निवारण झाले.

ब्रह्मदेवाकडून वरदान प्राप्त करतांना कुंभकर्णाला इंद्रासन मागायचे होते; परंतु देवतांच्या प्रार्थनेवरून महासरस्वती कुंभकर्णाच्या जिभेवर विराजमान झाली होती. त्यामुळे कुंभकर्णाने इंद्रासनाऐवजी निद्रासनाचे वरदान मागून घेतले. तारकासुराच्या तीन तारक पुत्रांचा पाडाव कसा करावा ?, असा प्रश्न समस्त देवतांपुढे पडल्यावर श्रीहरि विष्णूने त्यांना धर्मविमुख होण्यास प्रवृत्त करण्याचा उपाय सांगितला. धर्मविमुख करण्याचा उपाय कशा प्रकारे साध्य करायचा ?, याचे मार्गदर्शन माता सरस्वतीने नारदाला देऊन देवतांना साहाय्य केले. शिवाच्या अंशातून आणि समुद्रातून उत्पन्न झालेला जालंधर हा दैत्य देवतांना ग्रासू लागला. लक्ष्मीचा जन्मही समुद्रमंथनातून झाल्यामुळे नात्याने जालंधर लक्ष्मीदेवीचा धाकटा भाऊच लागत होता; परंतु तो देवतांना त्रस्त करत असून त्याच्या मनामध्ये पार्वतीविषयी कामवासनेचे अधर्मी विचार असल्याने त्याचा नाश व्हावा, ही कामना लक्ष्मीने श्रीहरि विष्णूकडे केली. यावरून लक्ष्मीदेवी तत्त्वनिष्ठ असून तिने अधर्माने वागणार्या स्वतःच्या भावाची पाठराखण न करता देवतांच्या पक्षात निर्णय दिला आणि स्वतःचे धर्मकर्तव्य पूर्ण करून आदर्श उदाहरण जगापुढे मांडले. त्रेतायुगामध्ये श्रीरामाने नवरात्रीच्या कालावधीत देवीची उपासना केली आणि देवीच्या कृपाशीर्वादानेच विजयादशमीला रावणाचा वध केला. द्वापरयुगातही श्रीकृष्णाच्या प्रेरणेने अर्जुनाने महाभारताच्या युद्धाला आरंभ करण्याआधी श्री दुर्गादेवीला शरण जाऊन प्रार्थना केली. श्री दुर्गादेवीने प्रसन्न होऊन अर्जुनाला विजयश्रीचा आशीर्वाद दिला. श्री दुर्गादेवीच्या कृपेचे कवच धारण करूनच अर्जुनाने महाभारताचे युद्ध करून त्यात विजय प्राप्त केला. त्वष्टा ऋषि, मार्कंडेय ऋषि हे देवीचे उपासक ऋषि होते, तर भक्त सुदर्शन हा शक्तीउपासक राजा होता. सर्वसामान्य जनांपैकी त्र्यंबकराज, नवीनचंद्र हे देवीचे परम भक्त होते.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## मा ब्रह्मचारिणी

माळ द्वितीय गुंफता
जीवन हो सत्कारणी
रूप भावते साधका
श्रीमाता ब्रह्मचारिणी

तेजःपुंज गौरवर्णीय
रूप लोभस भावणी
खिळून राहती नयन
पायांवर घेई लोळणी

कमंडलू ते एक हाती
दुजांस माळ धारिणी
शुभ्र वस्त्रांकित आई
फिटे अक्षास पारणी

कठीण तप अपर्णेचे
जिंके शंकरा योगिनी
समर्थ कैलासाधिपती
शोभली सार्थ संगिनी

जाई जुई कमल फुले
वाहतो हेमा मालिनी
मनमाझे निर्मल करी
वर द्यावा तू शालिनी

दहीदुग्ध प्रिय तुजला
नैवेद्य ठेवे सौदामिनी
तवकृपा शुध्द प्रसाद
चित्तस्थीर हे कामिनी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# नवरात्रातील देवीचे दुसरे रूप : माता ब्रह्मचारिणी

काल पासुन नवरात्री उत्सव धामधूमीत सुरु झाला आहे. आज नवरात्रीचा दुसरा दिवस्! आजचे मातेचे सुंदर रूप, कथा त्याविषयी माहिती जाणून घेऊया.

आजचे देवीचे रूप आहे माता ब्रह्मचारींणीचे. या देवीलाही श्वेतवस्त्र म्हणजेच पांढरी वस्त्रे आवडतात त्यामुळे या देवीला पांढरी वस्त्रे घालावीत. मातेला मात्र पांढरा रंग पसंत असल्याने पांढरा गुलाब, मोगरा, चमेली, तगर, किंवा कोणत्याही पांढऱ्या सुवासिक फुलांची माळ बनवली जाते. शक्यच नसते,तिथे झेंडूच्या फुलांची माळ बनवून घातली जाते. मंदिरात,देवघरात पांढऱ्या फुलांची आरास करावी. या ब्राह्मचारिणी मातेला कमळाचे फुल सुद्धा प्रिय आहे.

देवीला साखरेचा, दूध साखरेचा नैवेद्य किंवा साखरेपासून बनवलेले पदार्थ यांचा नैवेद्य दाखववावा . साखरेने बुद्धिमत्तेत वाढ होते तसेंच दीर्घायुष्य मिळते असे म्हटले जाते. दुर्गा देवीचे 'ब्रह्मचारिणी ' हे दुसरे रूप आहे.

हिमालयाच्या पोटी जन्म घेतल्यावर उमेचे म्हणजेच पार्वतीचे शंकरावर प्रेम जडले . शंकर हाच पती मिळावा अशी इच्छा होती . त्यासाठी नारदमुनींनी तिला कठोर तपश्चर्या करण्यास सांगितली .त्याप्रमाणे तिने ते अतिशय कठीण व्रत केले म्हणून तिला ' ब्रह्मचारिणी ' किंवा

'तपश्चारीणी ' असे संबोधले जाते .

या देवीची मूर्ती अतिशय प्रसन्न , शांत असून भव्य ,सुरेख आहे . तिच्या उजव्या हातात जपमाळ आहे तर डाव्या हातात कमंडलु आहे. तिच्या उपासनेने साधकाला



ज्ञान, एकाग्रता आणि यश मिळते, असे मानले जाते. ब्रह्मचारिणी देवीच्या पूजनाने सुख, शांतता, समृद्धता आणि धर्म प्राप्त होते. विवाहात येणाऱ्या समस्या, अडचणी दूर होतात, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. ब्रह्मचारिणी देवीला केवळ साखर किंवा मिश्रीचा नैवेद्य दाखवला, तरी देवी प्रसन्न होते, असे म्हटले जाते. ही तपस्विनी असल्यामुळे तिला सात्विक आहार म्हणजेच दूध, साखर, फळे प्रिय आहेत. एकाग्रचित्ताने केलेल्या पूजनामुळे तणाव, चिंता दूर होऊन प्रसन्नता, निष्ठा आत्मविश्वास आणि ऊर्जेचा विकास होतो. यश व प्रगतीचे मार्ग प्रशस्त होतात, असे सांगितले जाते . ब्रह्मचारिणी देवीच्या उपासनेमुळे साधकाचे मन स्वाधिष्ठान चक्रात स्थित होते.

तिच्या उपासनेने सर्व मनोकामना पूर्ण होतात, बुद्धीची वाढ होते आणि एकाग्रता वाढते, असे मानले जाते.

तिच्या उपासनेमुळे कुटुंबात सुख-समृद्धी टिकून राहते. या देवीलाही शांत, सात्विक, स्वच्छ असा शुभ्र धवल रंगच शांत असल्यामुळे अधिक प्रिय आहे .

कुमारिकांना सुयोग्य , मनाप्रमाणे पती मिळावा, लवकर लग्नाचा योग यावा यासाठी कुमारीकांनी ब्राह्मचारीणी मातेची मनोभावे पूजा, उपासना करावी. तिला प्रसन्न करण्यासाठी पुढील मंत्राचा जप करावा.

या देवी सर्वभूतेषु मां ब्रह्मचारिणी रूपेण संस्थिता।नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।। दधाना कर मद्माभ्याम अक्षमाला कमण्डलू।देवी प्रसीदतु मयि ब्रह्मचारिण्यनुत्तमा श्रश्र

चला मग ,देवीच्या या रूपाचे मनोभावे पूजन करून, आराधना करूया. आजचा शुभ रंग पांढराच असल्यामुळे आज पांढरी वस्त्रे परिधान करणे सर्वांसाठी उत्तम फळ देणारे आहे अशी भविकांची श्रद्धा आहे.

***- सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.***

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात बातम्या

## घणसोली येथे भंगार गोडाऊनला लागलेल्या आगिने, भंगार गोडाऊन तसेच CNG कार जळून खाक



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.११, नवी मुंबई :** घणसोलीतील गुणाली तलावासमोर असलेल्या अनधिकृत भंगार दुकानाला रात्रीच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत भंगार दुकानाचे मोठे नुकसान झाले असून, दुकानाजवळ उभी असलेली CNG कार पूर्णपणे जळून खाक झाली. सुदैवाने CNG सिलिंडरचा स्फोट झाला नाही आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.गुणाली तलावासमोरील या भंगार दुकानाचे अतिक्रमण संबंधित अधिकाऱ्यांना इतके दिवस दिसले नाही का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय तडवी आणि अतिक्रमण अधिकारी रितेश पुरव यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आगीत CNG कार जळून खाक झाली; सुदैवाने सिलिंडरचा स्फोट टळला. कोपरखैरणे अग्निशमन केंद्राच्या जवानांनी आग आटोक्यात आणत संभाव्य मोठी दुर्घटना टाळली.

## कौशल्यविकास विभाग विश्वविक्रमासाठी सज्ज; 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'ला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, नवी मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत आयोजित 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' या नवोपक्रम स्पर्धेला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रातून आतापर्यंत तीन हजारांहून अधिक, तर गोवा, दिव-दमण आणि छत्तीसगड या राज्यांतून सहा हजारांहून अधिक विद्यार्थी, युवक व युवतींनी नोंदणी केली आहे. या स्पर्धेत युवकांची विश्वविक्रमी नोंदणी करण्यासाठी कौशल्यविकास विभाग प्रयत्नशील असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २१ सप्टेंबरपासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुकांना १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. या स्पर्धेत वयोमर्यादा नसल्याने विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक, नवोन्मेषक, स्टार्टअप्स, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, कंपन्या, सामाजिक संस्था, शैक्षणिक व संशोधन संस्था तसेच विविध नवोपक्रम गटांना सहभागी होता येणार आहे.

कृषी, आरोग्य, महिला सुरक्षा, नागरी विकास, पर्यावरण, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, शिक्षण आणि रोजगारक्षमता अशा विविध क्षेत्रांतील समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची संधी या स्पर्धेतून मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या संशोधनाला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.

**दोन संस्थांशी सामंजस्य करार**

स्पर्धेचा प्रसार आणि युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी कौशल्यविकास विभागाने मंत्रालयात सृजन ट्रस्ट, पुणे आणि विज्ञान भारती कोकण प्रांत या संस्थांशी सामंजस्य करार केला.

या माध्यमातून स्पर्धेची माहिती अधिकाधिक युवक-युवतींपर्यंत पोहोचविण्यासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.

विज्ञान भारती कोकण प्रांतातर्फे विद्यार्थ्यांना प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आणि स्पर्धेच्या प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन मिळणार आहे. सृजन ट्रस्टच्या माध्यमातून व्यापक प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे. ट्रस्टतर्फे दरवर्षी 'डिपेक्स' उपक्रमांतर्गत नवकल्पना, स्टार्टअप आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातील युवकांसाठी परिषद आयोजित केली जाते. त्यामुळे या क्षेत्रातील युवकांपर्यंत स्पर्धेची माहिती पोहोचविण्यास मदत होणार आहे.

ऑनलाइन अर्जाची सुविधा इच्छुकांनी https://sevainnovationchallenge.in/ या संकेतस्थळावर किंवा क्यूआर कोड स्कॅन करून अर्ज व प्रकल्प सादर करावा. पहिल्या टप्प्यात प्राथमिक माहितीची नोंदणी करावी लागेल, तर दुसऱ्या टप्प्यात प्रकल्प सादर करताना आधारशी संलग्न वैयक्तिक माहिती आणि प्रकल्पाचा तपशील द्यावा लागेल. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन असून, उमेदवारांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी संकेतस्थळावर चॅटबॉटची सुविधाही उपलब्ध आहे.

या सामंजस्य करारावेळी सृजन ट्रस्टचे विश्वस्त दीपक मुकादम, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, सृजन ट्रस्टचे डॉ. अमित नेहते यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## नांदेड जिल्हा कारागृहातील ४२ बंद्यांचे फार्मर आयडी तयार
## बंद्यांच्या कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांचा पुढाकार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, नांदेड :** शेतकरी कुटुंबातील कर्ता व्यक्ती कारागृहात असल्याने त्याच्या कुटुंबाची शेती आणि शासकीय योजनांचा लाभ प्रभावित होऊ नये, यासाठी नांदेड जिल्हा प्रशासनाने संवेदनशील पुढाकार घेतला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हा कारागृहात आयोजित विशेष शिबिरात ४२ न्यायाधीन बंद्यांचे फार्मर आयडी (ॲग्रीस्टॅक) तयार करण्यात आले, तर २६ बंद्यांचे कर्जमाफी योजनेच्या अनुषंगाने ई-केवायसी अद्ययावत करण्यात आली. संबंधित बंद्यांना आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कारागृहाबाहेरील सुविधा केंद्रांवर जाण्याची गरज भासू नये, या उद्देशाने कारागृहातच विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. बंद्यांच्या कुटुंबांचे आर्थिक हित जपत त्यांना शेतीविषयक शासकीय योजनांच्या प्रवाहात कायम ठेवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश तुषार आगलावे यांनी या बंद्यांना फार्मर आयडी तयार करणे आणि विविध योजनांच्या लाभासाठी आवश्यक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे सुलभ व्हावे, यासाठी कारागृहात विशेष शिबिर आयोजित करण्याबाबत महसूल प्रशासनाला कळविले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी हे शिबिर घेण्यात आले.

*** फार्मर आयडीमुळे योजनांचा लाभ मिळविण्यास मदत**

ॲग्रीस्टॅकअंतर्गत फार्मर आयडी तयार झाल्यामुळे संबंधित शेतकरी कुटुंबांना पात्रतेनुसार प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान), पीक विमा, पीक कर्ज, कर्जमाफी आणि विविध कृषी अनुदान योजनांचा लाभ मिळविण्याची प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होणार आहे. यामुळे बंद्यांच्या कुटुंबांना शेतीविषयक योजनांशी जोडून ठेवण्यास आणि शेतीची कामे सुरू ठेवण्यास हातभार लागणार आहे.या विशेष उपक्रमासाठी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, तहसीलदार विपिन पाटील, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे, कारागृह अधीक्षक संपत आडे, तुरुंगाधिकारी विजय मेश्राम, बालासाहेब भराडे, व्यवस्थापक कपिल एकलारे, सीएससी संचालक ओमकेश माने आणि पंकज कपूरगे यांनी परिश्रम घेतले.

*** सामाजिक आणि आर्थिक आधार जपण्याचा प्रयत्न**

न्यायाधीन बंद्यांकडे केवळ गुन्हेगारीच्या दृष्टिकोनातून न पाहता, त्यांच्या कुटुंबांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा ही विचार करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचा हा प्रयत्न आहे. बंदी कारागृहात असतानाही त्यांच्या कुटुंबांचे शेतीविषयक हक्क आणि योजनांचा लाभ मिळविण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम प्रशासनाच्या संवेदनशील आणि लोकाभिमुख दृष्टिकोनाचे उदाहरण ठरतो.

## आ. जोरगेवार यांच्या हस्ते ५१ फूट उंच ध्वजाच्या ध्वजारोहनाने महाकाली महोत्सवाचा शुभारंभ





### मातेच्या चांदीच्या मूर्तीची निघाली पालखी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** शारदीय नवरात्रोत्सवाच्या घटस्थापनेनिमित्त रविवारी,११ ऑक्टोबर रोजी श्री माता महाकाली मंदिरात ५१ फूट उंच ध्वजाचे विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. श्री माता महाकाली महोत्सव ट्रस्टच्या वतीने आयोजित माता महाकाली महोत्सव २०२६ अंतर्गत हा सोहळा पार पडला. यावेळी आ.किशोर जोरगेवार यांनी मंदिरात उपस्थित राहून चांदीच्या माता महाकाली मूर्तीचे दर्शन घेतले त्यानंतर मातेची पालखी निघाली.

यावेळी मनीष महाराज, सुनिल महाकाले, राजु शास्त्रकार, अजय जयस्वाल, श्याम धोपटे, मिलिंद गंपावार, बलराम डोडाणी, प्रसाद जोरगेवार, संजू बुरघाटे, अरुण तिखे, सविता दंढारे, वंदना हातगावकर यांच्यासह श्री महाकाली माता महोत्सव ट्रसचे पदाधिकारी भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन यंदा महोत्सवातील मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कार्यक्रमांसाठी होणारा खर्च वाचवून दुष्काळग्रस्त शेतकर्यांना मदत करण्याचा मानस आहे. मात्र,महोत्सवातील धार्मिक परंपरा आणि सामाजिक उपक्रम पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार आहेत. श्रद्धा, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधत महोत्सवाची परंपरा जपण्यावर भर देण्यात आला आहे.

याबाबत आ. किशोर जोरगेवार म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहणा नंतरमहाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीत शेतकरी बांधवांच्या वेदना आणि अडचणी लक्षात घेणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द करून त्या खर्चातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र,माता महाकाली महोत्सवाची धार्मिक परंपरा आणि समाजोपयोगी उपक्रम सुरूच राहतील. मातेच्या आशीर्वादाने भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीची ही परंपरा पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

ध्वजारोहणानंतर चांदीच्या माता महाकाली मूर्तीची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर मूर्तीची पालखीतून रथापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. भजन-कीर्तनाच्या गजरात आणि वाजतगाजत हा रथ नितीन कुमरवार यांच्या निवासस्थानी नेण्यात आला. यंदा माता महाकालीची चांदीची मूर्ती घरी नेऊन भाविकांना दर्शनाची संधी उपलब्ध करून देण्याचा पहिला मान कुमरवार परिवाराला मिळाला. नवरात्रोत्सवाच्या काळात माता महाकालीच्या चांदीच्या मूर्तीचे घरोघरी दर्शन घडविण्याची परंपरा आहे. त्यानुसार कुमरवार परिवाराच्या निवासस्थानी मूर्ती विराजमान करण्यात आली आहे.

सोमवार, दि.१२ ऑक्टोबर रोजी नितीन कुमरवार यांच्या निवासस्थानावरून माता महाकालीची मूर्ती वाजत गाजत रामजीवन परमार यांच्या निवासस्थानी नेण्यात येणार आहे. घटस्थापनेच्या दिवशी ५१ फूट उंच ध्वजाचे ध्वजारोहण करून महोत्सवाच्या धार्मिक सोहळ्यांना सुरुवात झाली. दुष्काळग्रस्त शेतकर्यांप्रती सामाजिक बांधिलकी जपत मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द करण्यात आले असले,तरी धार्मिक परंपरा आणि समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून माता महाकाली महोत्सवाची वाटचाल सुरू राहणार आहे.

महोत्सवातील धार्मिक परंपरा आणि सामाजिक उपक्रम मात्र पूर्वनियोजित स्वरूपात सुरू राहणार आहेत. यामध्ये ९९९९ कन्यांचे पूजन व भोजन,सौभाग्यवती महिलांना अखंड सौभाग्याची कामना करत हिरवा चुडा भरून देण्याचा उपक्रम तसेच नवरात्रीदरम्यान जन्मलेल्या कन्यांना चांदीचे नाणे वाटप करण्यात येणार आहे. १९ ऑक्टोबर रोजी नगरप्रदक्षिणाही काढण्यात येणार आहे.

## पुण्यात 'परिक्रमा पर्यावरणाची'चे द्वितीय प्रकाशन



**अक्षराज : विठ्ठल निकाळजे**

**दि.११, कोथरूड :** पर्यावरणीय संकटांविषयी जनजागृती करणाऱ्या पर्यावरण कवी एम. टी. कदम लिखित 'परिक्रमा पर्यावरणाची' या कविता संग्रहाचे द्वितीय प्रकाशन शनिवारी एस. एम. जोशी सभागृह, नवी पेठ येथे झालेल्या या प्रकाशन सोहळ्यास डॉ. मंगेश सावंत, सुहास ताई, सुनीती ताई, सुजय मोरे आणि सुनील मोहिते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

'परिक्रमा पर्यावरणाची' या काव्यसंग्रहातून पाणी, जंगल, माती, प्रदूषण, प्लास्टिक, वृक्षतोड, अन्नाची नासाडी, वाढते तापमान, जागतिक तापमानवाढ आणि निसर्ग संवर्धन अशा विविध पर्यावरणीय प्रश्नांवर संवेदनशील भाष्य करण्यात आले आहे. पर्यावरणीय प्रश्नांकडे केवळ समस्या म्हणून न पाहता समाजामध्ये पर्यावरणाबाबत जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण व्हावी, हा या काव्यसंग्रहाचा प्रमुख मुद्दा होता.

पर्यावरणाची हानी समाजातील सर्व घटकांवर परिणाम करते. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाचा प्रश्न हा सामाजिक समतेच्या प्रश्नापासून वेगळा करता येणार नाही. पर्यावरणीय न्यायाचा विचार शहरांपासून गावांपर्यंत, शाळा-महाविद्यालयांपासून सामाजिक संस्थांपर्यंत पोहोचविण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

पर्यावरणाचा विषय केवळ चर्चा आणि घोषणांपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीशी जोडला जाणे आवश्यक आहे. साहित्याच्या माध्यमातून पर्यावरणविषयक विचार समाजमनात रुजविणे आणि त्याला सामाजिक कार्याची जोड देणे, हा 'परिक्रमा पर्यावरणाची'मागील महत्त्वाचा विचार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

पर्यावरण रक्षणाची जबाबदारी केवळ शासन, संस्था किंवा पर्यावरणप्रेमींची नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. निसर्गाचे संरक्षण म्हणजे केवळ झाडे वाचविणे नव्हे, तर माणूस, समाज आणि भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवणे होय, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.असे पीएमटी कदम यांनी सांगितले.

## निराधारांच्या हक्काच्या अनुदानासाठी आ.मुनगंटीवार यांचा मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** निराधार, दिव्यांग, विधवा आणि वृद्धांच्या उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार असलेल्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे मानधन वाढविण्यासाठी यापूर्वी विधानसभेत आवाज उठवून, अर्थमंत्री असताना अनुदान वाढीसाठी पुढाकार घेणारे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आता चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अनुदान वेळेवर मिळत नसल्याच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे.

ज्या अनुदानावर हजारो गरजू नागरिकांच्या दैनंदिन गरजा, औषधोपचार आणि उदरनिर्वाह अवलंबून आहे, ती रक्कम वेळेवर मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अनुदान वितरणातील विलंबामुळे लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे मानधन लाभार्थ्यांना नियमितपणे आणि वेळेत मिळण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना सन्मानाने जगता यावे आणि त्यांच्या आर्थिक गरजांना हातभार लागावा, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. विधानसभेत निराधारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यापासून ते अर्थमंत्री म्हणून अनुदान वाढीसाठी पुढाकार घेण्यापर्यंत त्यांनी या घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले.

राज्याचे अर्थमंत्री असताना आ.मुनगंटीवार यांनी अनुदानाची रक्कम ६०० रुपयांवरून १,२०० रुपये केली. त्यानंतरही ही मदत अपुरी पडत असल्याची जाणीव ठेवून, मानधन १,२०० रुपयांवरून १,५०० रुपये करण्यासाठी त्यांनी विधानसभेत सातत्याने आवाज उठवला.

निराधारांच्या आर्थिक गरजांची जाणीव ठेवून मानधनवाढीसाठी प्रयत्नशील राहिलेल्या आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आता या लाभार्थ्यांना मंजूर अनुदानाची रक्कम वेळेवर आणि नियमित मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेची रक्कम नियमितपणे मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या योजनेतील अनुदान हे लाभार्थ्यांसाठी केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे अनुदान वितरणात होणारा विलंब टाळून प्रत्येक पात्र लाभार्थ्याला निर्धारित वेळेत अनुदान मिळणे आवश्यक आहे. अनुदान वितरणात विलंब होण्यामागील तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणी दूर करून लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी.

तसेच भविष्यात अनुदान मिळण्यास विलंब होणार नाही, यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

मानधनवाढीसाठी यापूर्वी केलेल्या पाठपुराव्याप्रमाणेच आता निराधार लाभार्थ्यांना अनुदान वेळेवर मिळावे, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. समाजातील सर्वाधिक गरजू घटकांना त्यांच्या हक्काची आर्थिक मदत नियमितपणे मिळावी, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे.

# कर्जमाफीचे पैसे अद्यापही खात्यावर नाहीत

## अन्यथा 30 ऑक्टोंबर पासून रस्ता रोको आंदोलनाचा कुणबी सेनेचा सरकारला इशारा

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.११, उदगीर (लातूर) :** सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेला मोठा कालावधी उलटून गेला असला, तरी हजारो पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अद्यापही कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नाही. यामुळे ऐन रब्बी हंगामाच्या तोंडावर बळीराजा पुन्हा एकदा तीव्र चिंतेत सापडला असून, बँकेचे उंबरठे झिजवूनही पदरी निराशाच पडत असल्याचे चित्र आहे. दिवाळीपर्यंत कर्जमाफी जमा करा; अन्यथा दिनांक ३० ऑक्टोबर पासून रस्ता रोको आंदोलनाचा कुणबी सेनेचा सरकारला इशारा एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, बँकांचे उंबरठे झिजवण्याची वेळ शेतकऱ्यांना आली आहे. शासनाने कर्जमाफीची घोषणा केल्यावर शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. प्रशासनाकडून पात्र शेतकऱ्यांच्या एक व दोन याद्याही जाहीर करण्यात आल्या.



त्यातही अर्धवट शेतकरी दिसून येते. अजुनही ८० टक्के शेतकरी कर्जमाफी योजनेपासून लांबच राहिले आहेत.

मात्र, तांत्रिक अडचणी आणि संथ प्रशासकीय कारभारामुळे प्रत्यक्ष रक्कम बँक खात्यात वर्ग झालेली नाही. खरीप हंगाम हातातून गेल्यानंतर आता रब्बी हंगामासाठी बियाणे, खते खरेदी करायची कशी, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. तसेच तांत्रिक अडचणींचा खोळंबा झाला असून मिळालेल्या माहितीनुसार, 'आधार प्रम ाणीकरण' न होणे, बँक खात्याशी आधार लिंक नसणे आणि पोर्टलवरील तांत्रिक त्रुटी यांमुळे हजारो शेतकऱ्यांचे पैसे अडकून पडले आहेत. अनेक शेतकरी दररोज सेवा सहकारी सोसायट्या आणि राष्ट्रीयकृत बँकां व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये चकरा मारत आहेत, परंतु बँकांकडून वरतून अद्याप निधी आला नाही किंवा तांत्रिक काम सुरू आहे अशी त्रोटक उत्तरे दिली जात आहेत.

कुणबी शेतकरी संघटनेचे नेते विश्वनाथ पाटील यांनी प्रस्तुत निवेदनाद्वारे शेतकऱ्यांची मुख्य मागण्या सरकारकडे सांगितले आहे की, त्वरित निधी वितरित करुन पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कोणत्याही अटींशिवाय तातडीने कर्जमाफीची रक्कम जमा व्हावी. बँकेकडून अडवणूक थांबवावे, नवीन पिकासाठी तातडीने पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे. तसेच विशेष शिबिरे आयोजित करावीत आणि तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी प्रत्येक गावात किंवा बँकेत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे.

कर्जमाफीच्या आशेने आम्ही जुने कर्ज नील होण्याची वाट पाहत आहोत. नवीन कर्ज मिळेना आणि पदरचे पैसे संपले. सरकारने घोषणा केली पण बँकेत गेल्यावर पैसे आले नसल्याचे सांगितले जाते. आम्ही जगायचे कसे? जे.जी. शिंदे, बी.जी.शिंदे अतनूर येथील व्यतिथ शेतकरी कर्जदारआता या प्रकरणात शासन आणि बँक प्रशासन तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना दिलासा देणार का, याकडे संपूर्ण शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# झाडीपट्टी नाट्य प्रयोगांना परवानगी द्या; महेंद्र ब्राम्हणवाडे यांची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर/गडचिरोली :** गडचिरोली चंद्रपूरसह पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यांना झाडीरट्टी रंगभूमीचा समृध्द सांस्कृतिक वारसा लाभला आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या मनोरंजनासोबत सामाजिक प्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून झाडीपट्टी रंगभूमीने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. दरवर्षी या भागात शेकडो नाट्यप्रयोगांचे आयोजन केले जाते. मात्र, यंदा प्रशासनाकडून विविध कारणेपुढे करुन नाट्यप्रयोगांच्या परवानग्या नाकारल्या जात असल्याने झाडीपट्टी रंगभूमीशी संबंधित कलाकार, नाट्यसंस्था आणि या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो लोकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नाट्यप्रयोगांना परवानगी द्यावी, अशी मागणी कॉंग्रेस नेते महेंद्र ब्राम्हणवाडे यांनी केली आहे.




झाडीपट्टी रंगभूमी ही पूर्व विदर्भाच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ग्रामीण भागातील रसिक प्रेक्षकांना मनोरंजनाची मेजवानी देण्याबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक विषयांवर भाष्य करणारे नाट्यप्रयोग या रंगभूमीच्या माध्यमातून सादर केले जातात. ग्रामीण भागातील अनेक प्रतिभावान कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी झाडीपट्टी रंगभूमी हक्कांचे व्यासपीठ उपलब्ध करुन देते. त्यामुळे या रंगभूमीचे महत्व केवळ म नोरंजना पुरते मर्यादित नसून ती स्थानिक कला, संस्कृती आणि रोजगारनिर्मितीशीही जोडलेली आहे.

झाडीपट्टी नाट्य व्यवसायाच्या म ाध्यमातून दरवर्षी शंभर कोटी रुपयांहून अधिक आर्थिक उलाढाल होत असून व्यवसायात केवळ कलाकारच नव्हे, तर नाटकांचे लेखक, दिग्दर्शक, संगितकार, वादक, डेकोरेशनसह मंडप व्यावसायिक, वाहनचालक आणि इतर अनेक घटक सहभागी असतात. नाट्यप्रयोग यांच्या आयोजनामुळे स्थानिक बाजारपेठेला ही चालना मिळते.

परिणामी, या क्षेत्रातून हजारो लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरुपात रोजगार मिळतो. विशेषत: ग्रामीण भागातील कलाकारांसाठी हा व्यवसाय उपजीविकेचे नमहत्वपूर्ण साधन आहे. अशा परिस्थितीत नाट्यप्रयोगांच्या परवानग्या नाकारल्या गेल्यास त्याचा परिणाम केवळ नाट्यसंस्थांवर होत नाही, तर संपूर्ण नाट्यव्यवसायाशी संबंधित घटकांवर होतो. त्यामुळे परवानगी प्रक्रियेतील अडचणी दूर करुन नाट्यप्रयोगांना प्रशासनाने रीतसर परवानगी द्यावी, अशी मागणी महेंद्र ब्राम्हणवाडे यांनी केली आहे.

# कॉ. गोदावरी परुळेकर यांच्या हुतात्मा दिनानिमित्त माकपचे आंदोलन

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या बडतर्फीची मागणी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.११, डहाणू (पालघर) :** कॉ. गोदावरी परुळेकर यांच्या हुतात्मा दिनाचे औचित्य साधून भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) अर्थात माकपच्या वतीने शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी डहाणू तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना तातडीने बडतर्फ करावे, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची (SIR) प्रक्रिया थांबवावी आणि चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या पात्र मतदारांची नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करावीत, अशा प्रमुख मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या. लदेशातील निवडणूक प्रक्रियेबाबत प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांमुळे मतदारांमध्ये चिंता आणि रोष निर्माण झाल्याचा दावा माकपने निवेदनात केला आहे. मतदार यादीतील नावांचा सम ावेश, पात्र मतदारांची नावे वगळली जाणे आणि SIR प्रक्रियेतील त्रुटी यांसारख्या मुद्द्यांवर पक्षाने आक्षेप नोंदवले आहेत.

महाराष्ट्रातील डखठ प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील नोंदींबाबत निवेदनात काही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीत पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता असल्याने या प्रक्रियेची पारदर्शकपणे फेरतपासणी करण्यात यावी, अशी मागणी पक्षाने केली आहे.

मतदार यादी ही लोकशाही व्यवस्थेतील मूलभूत संस्था असून प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मि ळणे आवश्यक आहे. त्यामुळे मतदारांची नावे समाविष्ट करणे किंवा वगळणे ही प्रक्रिया पारदर्शक, विकेंद्रित आणि कायदेशीर अधिकार असलेल्या स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांच्या प्रभावी नियंत्रणाखाली असावी, असे निवेदनात म्हटले आहे. केवळ केंद्रीय तांत्रिक यंत्रणेवर अवलंबून न राहता प्रत्येक प्रकरणाची योग्य तपासणी करण्याची गरजही पक्षाने व्यक्त केली आहे. निवडणूक आयोगाने मतदार यादीतील त्रुटींची पारदर्शकपणे फेरतपासणी करून कोणत्याही पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार हिरावला जाणार नाही, याची खात्री द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत आक्षेप नोंदवत त्यांच्या बडतर्फीची मागणी करण्यात आली आहे. तसेच निवडणूक आयोगाचे कामकाज स्वतंत्र, स्वायत्त आणि लोकशाही तत्त्वांनुसार चालावे, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची विद्यमान पद्धत बदलून नियुक्ती प्रक्रियेत पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेल्या स्वतंत्र निवड समि तीची व्यवस्था करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय, प्रत्येक वगळण्यात आलेल्या मतदाराला आपली बाजू मांडण्याची आणि हरकती नोंदविण्याची प्रभावी संधी मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले, कॉ.रडका कलांगडा, कॉ. चंद्रकांत घोरखना, कॉ. लहानी दौडा यांच्यासह मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. तहसीलदार कार्यालयात निवेदन सादर करून पक्षाच्या वतीने निवडणूक प्रक्रियेबाबतची भूमिका मांडण्यात आली.

कॉ.गोदावरी परुळेकर यांच्या हुतात्मा दिनानिमित्त आयोजित या आंदोलनातून म तदारांचे अधिकार सुरक्षित ठेवणे, मतदार यादीतील त्रुटी दूर करणे आणि निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम राखणे या मुद्द्यांवर माकपने भर दिला. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा मूलभूत आधार असल्याने कोणताही पात्र नागरिक मतदार यादीतील त्रुटींमुळे मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी निवडणूक आयोगाने पारदर्शकता, स्वायत्तता आणि उत्तरदायित्व राखावे, अशी मागणी माकपने निवेदनातून केली आहे.



**माकपच्या ६ प्रमुख मागण्या**

१. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना तातडीने पदावरून बडतर्फ करावे.

२. SIR प्रक्रिया तात्काळ थांबवावी.

३. मतदार यादीतून चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या सर्व पात्र नागरिकांची नावे पुन्हा समाविष्ट करावीत.

४. प्रत्येक वगळलेल्या मतदाराला दावे व हरकती नोंदविण्याची आणि त्यावर निष्पक्ष सुनावणी मिळण्याची प्रभावी संधी द्यावी.

५. निवडणूक आयोगाचे स्वतंत्र, स्वायत्त आणि लोकशाही पद्धतीने चालणारे कामकाज पुनर्स्थापित करावे.

६. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची विद्यमान पद्धत बदलून पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांचा समावेश असलेल्या स्वतंत्र निवड समितीमार्फत नियुक्ती करण्याची व्यवस्था करावी.

## थोडक्यात बातम्या

### जनता विद्यालय, गोंडपिपरी येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत कराटे प्रशिक्षण

**अक्षराज : संतोष बांदूरकर**



**दि.११, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** विद्यार्थ्यांमध्ये स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण व्हावी, आत्मविश्वास वाढावा आणि संकटाच्या प्रसंगी स्वतःचे संरक्षण करता यावे, या उद्देशाने जनता विद्यालय, गोंडपिपरी येथे कुंदन पेंदोर यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी मोफत कराटे प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे.आजच्या काळात विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अनपेक्षित प्रसंगांना धैर्याने सामोरे जाणे, प्रसंगावधान राखणे आणि स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे, ही या प्रशिक्षणामागील प्रमुख उद्दिष्टे आहेत.

यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संयम, एकाग्रता आणि शारीरिक तंदुरुस्ती विकसित व्हावी, यावर ही भर दिला जात आहे.या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना कराटेची प्राथमिक तत्त्वे, विविध शारीरिक हालचाली आणि स्वसंरक्षणाची कौशल्ये शिकविली जात आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार असून, प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्यासाठी त्यांना मानसिकदृष्ट्याही सक्षम बनविता येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास कोकाटे सर होते. यावेळी देवेंद्र बल्की, बोबडे सर, बेताल मॅडम, लाडे मॅडम आणि शीरामे सर यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते.विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासाठी सक्षम बनविण्याच्या दृष्टीने कुंदन पेंदोर यांनी घेतलेला पुढाकार महत्त्वपूर्ण आहे.शिक्षणासोबतच जीवनोपयोगी कौशल्ये आत्मसात करण्याची संधी या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळत असून, त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे.

### सेवा संकल्प अभियानांतर्गत वाडा येथे २१७ हून अधिक दिव्यांगांची UDID प्रमाणपत्रांसाठी नोंदणी

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.११, वाडा (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत दिव्यांग बांधवांसाठी आयोजित शिबिरात २१७ हून अधिक दिव्यांग व्यक्तींची UDID (युनिक डिसॅबिलिटी आयडी) अपंगत्व प्रमाणपत्रांसाठी नोंदणी करण्यात आली. दिव्यांग व्यक्तींना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे, त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित झाले. या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना UDID कार्ड व अपंगत्व प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेसाठी मदत करण्यात आली. या उपक्रमासाठी डॉक्टर, आरोग्य विभागातील कर्मचारी तसेच विविध दिव्यांग संघटनांच्या पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले. दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय योजना, शैक्षणिक सवलती, प्रवास सवलती आणि इतर सुविधांचा लाभ घेण्यासाठी नृ्ख् कार्ड व अपंगत्व प्रमाणपत्र महत्त्वाचे ठरते. मात्र, अनेकदा माहितीचा अभाव, कागदपत्रांची पूर्तता आणि प्रशासकीय प्रक्रियेमुळे दिव्यांग बांधवांना अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेले हे शिबिर दिव्यांग व्यक्तींसाठी उपयुक्त ठरले. या उपक्रमासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संस्था, पालघरचे जिल्हाध्यक्ष तथा ओम साई दत्त विकलांग सेवा संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष सुनील अ. गुप्ता यांनी पुढाकार घेतला. तसेच पालघर तालुकाध्यक्ष सुनील चुरी, डहाणू तालुका कार्याध्यक्ष सचिन तांडेल, वाडा तालुकाध्यक्ष सुनील निपुरते (प्रहार दिव्यांग क्रांती संस्था), वाडा तालुका सचिव हरेश्वर पाटील आणि वाडा तालुका कार्याध्यक्ष विनोद पावडे यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. याशिवाय ओम साई दत्त विकलांग सेवा संस्थेचे वाडा तालुका उपाध्यक्ष अविनाश जाधव व वैभव पाटील, तालुका सचिव सचिन मोरे, सहकारी सुजाता ठाकरे तसेच सर्व तालुका कमिटीचे पदाधिकारी आणि सदस्यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले.

**दिव्यांगांच्या हक्कांसाठी संघटनांचा पुढाकार**

दिव्यांग व्यक्तींना आवश्यक प्रमाणपत्रे मिळवून देणे, त्यांना शासकीय योजनांची माहिती देणे आणि त्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे, यासाठी दिव्यांग संघटना सातत्याने प्रयत्नशील आहेत. वाडा येथील शिबिरात २१७ हून अधिक दिव्यांगांची नोंदणी होणे हा या प्रयत्नांचा महत्त्वपूर्ण भाग ठरला. या शिबिरासाठी सहकार्य करणारे सर्व डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सदस्य यांचे आयोजकांकडून मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. दिव्यांग बांधवांना सन्मानाने जगता यावे, त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा आणि त्यांना आवश्यक सुविधा सुलभतेने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

### भारतीय वंशाच्या नावी पिल्लई यांना नोबेल शांतता पुरस्कार




**अक्षराज : प्रातिनिधी**

**दि.११ :** आंतरराष्ट्रीय शांतता आणि मानवी हक्कांसाठी कार्य करणाऱ्या नावी पिल्लई यांना २०२६ चा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला आहे. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय-तामिळ वंशाच्या न्यायमूर्ती नावी पिल्लई यांना शांतता आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या प्रोत्साहनासाठी केलेल्या योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आला आहे. त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त म्हणून २००८ ते २०१४ या काळात काम केले.

तसेच आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेत न्यायाधीश म्हणून कार्य करताना युद्धगुन्हे, मानवतेविरुद्धचे गुन्हे आणि नरसंहार यांसारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी जबाबदारी निश्चित करण्याच्या प्रयत्नांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. न्याय, मानवी हक्क आणि समानतेसाठीची त्यांची प्रदीर्घ वाटचाल जगभरातील महिलांसाठी प्रेरणादायी आहे.